प्रेसनोट दि. ११/०३/२०१९

सामाजिक सुरक्षा विभागाकडुन पुणे शहरात छापे टाकुन वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करुन **दोन बांग्लादेशी मुलींची सुटका व एक बांग्लादेशी युवकासह दोघांना अटक**

दि. ०८.०३.२०१९ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पो.हवा. नितीन तरटे यांना बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, स्वारगेट पोलीस स्टेशन हद्दीमध्ये इसम नामे महिला नामे कविता पुर्ण नाव माहिती नाही रा. वाशीम हि व इमस नामे आतिक खान रा. तासबाग, नागपुर, मुळ गाव- बांग्लादेश हे राज्यातील व परराज्यातील मुलींना वेश्या व्यसायाकरीता प्राप्त करुन घेवून त्यांचा गि-हाईकांशी संपर्क करुन त्यांचेकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत असुन ते आज रोजी हॉटेल नटराज समोर स्वारगेट,पुणे येथे वेश्या व्यवसायासाठी मुली घेवुन येणार आहेत.

वरील मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर या विभागाकडील अधिकारी व कर्मचारी असे नटराज हॉटेल, जेधे चौक, स्वारगेट, पुणे येथे छापा टाकुन २ बांग्लादेशी सज्ञान मुलींची सुटका करुन आरोपी नामे १) आतीकखान साहेब खान वय २४ वर्ष प्लॉट नंबर २५, गणपती नगर, गोधनी रोड, झिंगाबाई टाकली, मानका पुर नागपुर ग्राम हेदरपुर पो स्टे बादुरीया जि. उत्तर चोवीस परगना पश्चिम बंगाल, २) अकीबुर नजरुल शेख वय २४ वर्षे रा. कात्रज संतोष नगर, पुणे मुळगाव - धुडुलीया थाना नोंडाईल, ग्राम थरोलीया, पोष्ट खुलना जि नोडाईल, बांगलादेश यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेवुन सदर आरोपींच्या विरोधात स्वारगेट पोलीस स्टेशन गुरनं. १६५/२०१९ इटपा कायदा ॲक्ट ४,५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

**वरील नमुद कारवाइ ही मा.श्री. भानुप्रताप बर्गे सपोआ,गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि मनिषा झेंडे, पो उपनि श्री अनंत व्यवहारे, मपोउपनि योगिता कुदळे, पो हवा ४८८६ कचरे, पोहवा ४६४९ घोगरे, पो ना २१९२ तेलंगे, पो शि ८६२८ पालवे, मपोहवा ५१०४ येळे, पोना ६१०५ चांदगुडे, मपोना ५०८७ शेवाळे, पो ना ६८१५ नरोटे ) यांनी केलेली आहे.**